# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः25.12.2024** **वारःबुधवार**

---

1. हरित उर्जेच्या माध्यमातून राज्यातले शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास
2. दुसरं विश्व मराठी संमेलन येत्या 27 फेब्रुवारीपासून पुण्यात होणार
3. राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या विविध उपक्रमांचं उद्घाटन
4. नाताळ सणाचा राज्यभरात उत्साह; ठीकठिकाणच्या चर्चमध्ये प्रभू येशूचा जन्मोत्सव साजरा आणि
5. महिला क्रिकेटमध्ये वेस्ट इंडीजविरुद्धच्या मर्यादित षटकांच्या मालिकेत भारताची 2-0 अशी विजयी आघाडी

**मुख्यमंत्री**

राज्यभरात सौर ऊर्जेचा वापर करणारे सौर ग्राम तयार करण्यात येत आहेत; यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होईल; भविष्यात या हरित ऊर्जेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प दोन अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील उंबरठा आणि धाराशिव जिल्ह्यातील नारंगवाडी इथल्या प्रकल्पांचं लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल दूरस्थ माध्यमातून करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते.

**उदय सामंत**

दुसरं विश्व मराठी संमेलन येत्या 27 फेब्रुवारी ते 1 मार्च या कालावधीत पुण्यात होईल अशी माहिती मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली. सामंत यांनी काल पिंपरी चिंचवडमध्ये मराठी भाषा विभागाची आढावा बैठक घेतली. मराठी भाषा विभागाने मराठी भाषेचा गौरव वाढेल, तसंच हा विभाग प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहोचेल अशा पद्धतीने काम करावं असे निर्देश सामंत यांनी यावेळी दिले. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे; त्याचं महत्त्व तसंच त्यामुळे होणाऱ्या लाभांची माहिती युवकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करावेत. असंही त्यांनी सांगितलं.

**उद्योग**

उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सर्व संबंधित विभागांशी समन्वय साधून उपाययोजना कराव्यात, असे निर्देश उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले. उद्योगांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली. पिंपरी चिंचवडमध्ये झालेल्या उद्योग विभागाच्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते.

**पंतप्रधान**

आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्ली इथं आर्थिक क्षेत्रातल्या तज्ज्ञांशी चर्चा केली. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी व्ही आर सुब्रमण्यम

आणि इतर वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते. विकसित भारत घडवण्यावर लक्ष्य केंद्रित करण्याची मानसिकता आपल्याला तयार करावी लागेल असं पंतप्रधान यावेळी म्हणाले.

**अटल बिहारी वाजपेयी जयंती**

माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त वाजपेयी यांच्या नवी दिल्लीतील सदैव अटल या समाधीस्थळी त्यांना आज अभिवादन करण्यात येईल. अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती देशभरात सुशासन दिन म्हणून साजरी केली जाते. यानिमित्त देशभरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**ग्राहकदिन**

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त काल देशभरात अनेक उपक्रम घेण्यात आले. प्रामुख्यानं ऑनलाईन माध्यमातून होणारी फसवणूक टाळून ग्राहकांना सक्षम करण्याच्या उद्देशानं विविध मंचाचं उद्घाटन केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी काल केलं. यात जागो ग्राहक जागो ॲप, जागृती ॲप, आणि जागृती डॅशबोर्डचा समावेश आहे. सरकार ग्राहकांच्या हक्कांचं संरक्षण करण्यासाठी वचनबद्ध आहे, असं प्रल्हाद जोशी यांनी यावेळी सांगितलं.

**ग्राहक दिन**

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त ग्राहकांना कायदे आणि हक्कांची माहिती तसंच जाणीव व्हावी या उद्देशानं आयोजित प्रदर्शनाचं उद्घाटन पुण्याचे अप्पर जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास मापारी यांच्या हस्ते करण्यात आलं. शहादा, सांगली, सोलापूरसह राज्यात अनेक ठिकाणी ग्राहक दिनानिमित्त कार्यशाळा, प्रचारफेरी यांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**शिक्षण धोरण**

शालेय विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करण्याचं धोरण अर्थात 'नो डिटेन्शन पॉलिसी' रद्द करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचं पुण्यातील पालक संघटनांनी स्वागत केलं आहे. सावित्री सन्मान प्रतिष्ठानच्या सोनल कोद्रे याबाबत आकाशवाणीशी बोलताना म्हणाल्या....

**पक्षी**

हिवाळा सुरू झाल्यावर पुणे जिल्ह्यात अनेक ठिकाणी परदेशातून मोठ्या प्रमाणावर पक्षी स्थलांतरित होतात. येरवडा, पाषाण तलाव, भिगवण या ठिकाणच्या पाणवठ्यावर विविध बदकं, शिकारी पक्ष्यांमध्ये दल दल ससाणा, तसंच इतरही अनेक पाण पक्षी बघायला मिळत आहेत. पुढील पंधरा ते वीस दिवस या पक्ष्यांचे थवे पुणे जिल्ह्यात असतील, अशा वेळी पक्षी निरिक्षणाला जाणाऱ्या नागरिकांनी विशेष काळजी घेणं आवश्यक असल्याचं पक्षी अभ्यासक विशाल तोर्डे यांनी सांगितलं....

**नाताळ**

प्रभू येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस म्हणजेच नाताळच्या सणाचा आज सर्वत्र उत्साह आहे. काल रात्री 12 वाजता सर्व ठिकाणच्या चर्चमध्ये प्रभू येशूचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. ख्रिश्चन धर्मीय नागरिकांनी एकमेकांना ख्रिसमसच्या आणि येणाऱ्या नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. नाताळनिमित्त ठिकठिकाणच्या चर्चमध्ये आकर्षक सजावट करण्यात आली असून येशू जन्माचे देखावे साकारण्यात आले आहेत. कॅरोल गायनासह अनेक कार्यक्रमांमध्ये ख्रिस्ती बांधव मोठ्या उत्साहाने सहभागी होत आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यात चर्चची मोठी परंपरा आहे. हे सर्व चर्च विद्युत रोषणाईने उजळले असून जागोजागी दिसणारा सांताक्लॉज आणि नाताळ वृक्ष सर्वांचं लक्ष वेधून घेत आहेत. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत काल मुंबईत राजभवन इथं नाताळ निमित्त स्नेहमिलन झालं. यावेळी राज्यपालांनी सर्वांना नाताळ आणि नववर्षानिमित्त शुभेच्छा दिल्या.

**<u>देहदान-रत्नागिरी</u>**

रत्नागिरीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रथमच देहदान करण्यात आलं आहे. शहरातल्या पऱ्याची आळी इथं राहणारे दिगंबर साठे यांचं 22 डिसेंबरला निधन झालं. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी उपयोग व्हावा, या हेतूनं दिवंगत साठे यांचा देह दान करण्याचा निर्णय त्यांच्या कुटुंबीयांनी घेतला. नागरिकांनी देहदानाचा संकल्प करावा, असं आवाहन रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉक्टर रामानंद यांनी केलं आहे.

**<u>महिला क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये वेस्टइंडीजविरुद्धचा मर्यादित षटकांचा दुसरा सामना काल भारतानं 115 धावांनी जिंकला. या विजयाबरोबरच तीन सामन्यांच्या या मालिकेत भारतानं 2-0 अशी विजयी आघाडी घेतली आहे. वडोदरा इथं झालेल्या कालच्या सामन्यात हरलीन देओलच्या धडाकेबाज शतकी खेळीच्या जोरावर भारतानं पाहुण्या संघाला 359 धावांचं मोठं लक्ष्य दिलं. या लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडीजचा संघ 47 व्या षटकापर्यंत केवळ 243 धावाच करू शकला. या मालिकेतला अखेरचा तिसरा सामना येत्या शुक्रवारी होणार आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात राज्यभरात हवामान कोरडं राहण्याची शक्यता आहे. मात्र येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल. तर काही ठिकाणी मेघगर्जनेसह गारपीट होईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर या भागातल्या शेतकऱ्यांनी कृषिविषयक सल्ला आणि हवामानाच्या अंदाजाकडे लक्ष ठेवून त्यानुसार नियोजन करावं, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.